
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 16 एप्रिल 2026 | अंक क्र. 326 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com









# ना. पंकजाताई मुंडे चार दिवस विदर्भ दौऱ्यावर शासकीय बैठका, लोकार्पण आदी भरगच्च कार्यक्रम

■ वर्धा प्रतिनिधी

कडक उन्हामुळे एकीकडे अंगाची लाही लाही होत असताना अशा वातावरणात राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे मात्र पशूपालकांसाठी सरसावल्या आहेत. आजपासून चार दिवस त्या विदर्भ दौऱ्यावर असून आज त्या वर्धा इथे होत्या.

जिल्ह्यातील काही भागात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी आणि चाऱ्याअभावी काही पशुपालक आपल्या पशुंचे स्थलांतरण करीत असल्याचे येथे आल्यानंतर समजले. हे स्थलांतरण थांबविण्यासाठी पशुपालकांच्या गावाशेजारीच पाण्याची उपलब्धता असलेल्या भागात कायमस्वरुपी पाणी आणि चारा उपलब्ध करून देणाऱ्या छावण्या लावण्यासाठी प्रयत्न करू, असे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.जगदीश बुकतरे यांच्यासह पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कृषी व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पाणी आणि चाऱ्याअभावी पशुंचे स्थलांतरण करावे लागू नये. आमच्याकडे मोठ्या प्रमाणावर चारा छावण्या लावल्या जातात. त्याच धर्तीवर जिल्ह्यात ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने स्थलांतरण केले जाते, तेथे गावाशेजारीच पाण्याची व्यवस्था बघून कायमस्वरुपी छावण्या उभ्या राहिल्या तर आपण स्थलांतरण थांबवू शकू. त्यामुळे यासाठी काय करता येईल, यादृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

ठिकठिकाणी गाईंचे क्लस्टर उभे राहात आहे. विशिष्ठ गाईंना विशिष्ट वातावरण लागते. त्यामुळे जिल्ह्यात गाईंचे क्लस्टर तर कराच शिवाय येथले वातावरण पाहता शेळींचे क्लस्टर केले तर शेतकरी व पशुपालकांना अधिक फायदा होईल. अशा क्लस्टरसाठी पशुसंवर्धन विभागाचे काही सहकार्य लागल्यास उपलब्ध करून देऊ. यासाठी सचिवांना निर्देश देण्यासह अधिकाऱ्यांना यात पुढाकार घेण्यासाठी निर्देश देऊ, असे मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या.

## पशुचिकित्सालयाचे केळझर येथे भूमीपूजन तर सेलडोह येथे लोकार्पण

## पशूपालकांचे नुकसान होणार नाही याची सरकार काळजी घेईल ; जनावरांचे स्थलांतरण थांबविण्यासाठी कायमस्वरूपी छावण्या लावण्यासाठी प्रयत्न

## पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत घेतली बैठक

### देशी गायींच्या संवर्धनासाठी स्वतंत्र बैठक घेऊ

■ वर्धा जिल्ह्यात गवगाऊ ही उत्तम दर्जाची देशी गाय आहे. परंतू गेल्या काही वर्षात या गाईंची संख्या कमी होत आहे. या गाईचे संवर्धन होणे आवश्यक असल्याचे मत पालकमंत्री डॉ.पंकज भोयर व काही पशुपालकांनी बैठकीत व्यक्त केले. या गाईच्या संवर्धनासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. यासाठी काय धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, त्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्या म्हणाल्या. जिल्ह्यात पशुधन व दुग्धव्यवसाय वाढविण्यासाठी विविध विभागाच्या सहकार्याने चांगले काम करू, असे ही त्यांनी सांगितले.

### दिव्यांग मुलींना किसान विकास पत्राचे वितरण

■ जिल्हा परिषदेच्या सेसफंड योजनेतून वर्ग 1 ते 10 पर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थीनींना 25 हजार रुपयांचे किसान विकास पत्र देण्याची योजना राबविण्यात येत आहे. मंत्री पंकजा मुंडे व पालकमत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात काही विद्यार्थीनींना वाटप करण्यात आले. सेसफंड योजनेतूनच दिव्यांगांना स्कुटीचे चाव्या देऊन वितरण करण्यात आले.

### पशुचिकित्सालयाचे लोकार्पण

■ सिध्दी विनायक गणपती मंदिर केळझर येथील सांस्कृतिक सभागृह येथे केळझर येथील पशुचिकित्सालयाचे भूमीपूजन, सेलडोह येथील पशुचिकित्सालयाचे लोकार्पण, ग्राम पंचायत येथे आपले सरकार सेवा केंद्राचे लोकार्पण व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत विविध लाभाचे वाटप यावेळी ना. पंकजाताईंच्या हस्ते झाले. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत सुविधा पोहोचवणे आणि पशुधनाचे रक्षण करणे हाच या कामांचा मुख्य उद्देश असल्याचे त्या म्हणाल्या.

# खरीप हंगाम आढावा बैठक आष्टी येथे संपन्न; खतटंचाई, पावसाची अनिश्चितता आणि पीक बदलावर भर

## आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

■ आष्टी (प्रतिनिधी)

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक आढावा बैठक बुधवारी दुपारी आष्टी येथील तहसील कार्यालयात आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी हंगामाचे नियोजन, संभाव्य अडचणी आणि उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यांचे तहसीलदार, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीला संबंधित विभागांनी आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रातील खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा सादर केला. यावेळी आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, यंदाचा खरीप हंगाम अनेक आव्हानांनी भरलेला असण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे खत पुरवठ्यावर परिणाम होत असून, इराण–अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा तुटवडा जाणवू शकतो. परळी व अहिल्यानगर येथून अपेक्षित प्रमाणात खत उपलब्ध होत नसल्याची बाब व्यापाऱ्यांनी मांडली. या पार्श्वभूमीवर आष्टी येथे खतांचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी न्यू आष्टी रेल्वे स्थानकावर रॅक सुरू करण्यासाठी शासन स्तरावर लवकरच हालचाली करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे पावसाबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याचे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचा विचार करावा, तसेच पावसावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या बियाण्यांपासून सावध राहावे, असे आवाहनही करण्यात आले. कृषी विभागाने याबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना आमदार धस यांनी दिल्या. बैठकीत राष्ट्रीय महामार्ग 561 (बीड–अहिल्यानगर मार्ग) अंतर्गत पाटोदा तालुक्यातील नायगाव परिसरातील रस्त्याच्या कामांबाबतही चर्चा झाली. शेतकरी व स्थानिक नागरिकांच्या अडचणींची दखल घेत त्या मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच मुरघास (सिलेज) तयार करण्याच्या पद्धतीत बदल करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. भोत पद्धतीऐवजी जमिनीवर मुरघास करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून नुकसान टाळता येईल. एकूणच, खरीप हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, तसेच शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी (बीड), उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गरजे, मोहीम अधिकारी सय्यपा गरांडे, तहसीलदार वैशाली पाटील, निलावाड साहेब, घोळवे साहेब, गटविकास अधिकारी बागलाने, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, अमृत गांगर्डे, ओमकार शेळके, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक वल्लभ भोसले, कृषी अधिकारी नागसेन शिंदे, पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप, कृषी उत्पन्न बाजार समिती कडा चे सभापती रमजान तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते.




## संपादकीय

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारी-तून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकांना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही. सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली. सांगली, कोल्हापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहासात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. 'तारा'सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेकोरपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही. ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन 'तारा' हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसहभाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल. फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर कादंबरी



अमरावतीच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी व कृषी महर्षी डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन चरित्रावर लवकरच कादंबरी साकारणार आहे. मराठीमधील सुप्रसिद्ध लेखक व ज्यांनी किमान 200 पुस्तके प्रकाशित केलेली आहेत असे वर्ध्याचे सुप्रसिद्ध लेखक प्रा. नवनीत देशमुख यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. प्रा नवनीत देशमुख हे सुप्रसिद्ध कादंबरीकार असून नुकतीच त्यांनी अमरावतीच्या माजी पालकमंत्री श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या जीवनावर वसुधा नावाची कादंबरी लिहिली आहे .या कादंबरीचे प्रकाशन सुप्रसिद्ध व भव्य असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे नुकतेच संपन्न झाले आहे.

त्यांचे वाङ्मय कौशल्य लक्षात घेऊन डॉ पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीचे संचालक प्रा. डॉ नरेशचंद्र काठोळे यांनी त्यांना डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख व माजी कुलगुरू तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष श्री दादासाहेब काळमेघ यांच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याची विनंती केली. त्यांनी ह्या दोन्ही विनंत्या मान्य केल्या असून सुरुवातीला ते डॉ पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन चरित्र तसेच त्यांचे पापळ गाव व इतर परिसराचा अभ्यास करून या कादंबरीला मूर्त रूप देणार आहेत. श्री दादासाहेब काळमेघ यांना जाऊन फार वर्ष झालेली नाहीत .त्यामुळे दादा साहेब काळमेघ यांच्या समकालीन लोक अजूनही मुलाखतीसाठी उपलब्ध आहेत. शिवाय त्यांचे सुपुत्र श्री हेमंत काळमेघ हे सध्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेत कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी श्री हेमंत काळमेघ यांना या कादंबरीची माहिती दिली असून या प्रगतीची माहिती त्यांना उपलब्ध करून दिली आहे.

डॉ पंजाबराव भाऊसाहेब देशमुख त्यांच्या जन्मशताब्दीमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीने युग निर्माता नाटक जनतेसमोर सादर केले होते. तेव्हापासून त्यांच्या जीवनावर कादंबरी असावी असे वाटत होते. यापूर्वी प्रा.सौ कल्पना देशमुख यांनी डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनावर भाऊ नावाची कादंबरी लिहिली असून ती प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीला प्रकाशित करण्याची सर्व जबाबदारी डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीने स्वीकारली असून आज कवी श्रेष्ठ श्री सुरेश भट यांच्या जयंतीनिमित्त या कार्याला रितहर सुरुवात झाली आहे. डॉ भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर नवनीत देशमुख सारखे सिद्धहस्त लेखक कादंबरी लिहिणार ही बातमी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांना सुखद धक्का देणारी आहे. प्रा. नवनीत देशमुख यांनी हा संकल्प जाहीर केल्याबद्दल त्यांचा प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी शाल व पुस्तक देऊन गौरव केला आहे

**■ प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे संचालक मिशन आयएएस अमरावती कॅम्प 9890967003**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, बाबासाहेब पाटील, राजेंद्र दर्डा, मधुकर भावे यांच्या मुख्य उपस्थितीत 18 एप्रिल शनिवार रोजी परिषदेच्या अधिवेशनाचे भव्य उद्घाटन

## देशभरातून 2500 पत्रकार उपस्थित राहणार..

**■ उदगीर प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचं 44 वं राष्ट्रीय अधिवेशन 18 आणि 19 एप्रिल 2026 रोजी रोजी उदगीर इथे होत आहे. उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहात असून लोकमतचे समुह संपादक मा. श्री. राजेंद्र दर्डा अधिवेशनाचे उद्घाटन करतील.आ. श्री. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.. बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री मा. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष आहेत तर आमदार मा. श्री. संजय बनसोडे सह स्वागताध्यक्ष आहेत. परिषदेचे मुख्य विश्वस्त मा. श्री. एस.एम.देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील तर मा. श्री. मिलिंद अष्टीवकर हे अधिवेशनाचे अध्यक्ष असतील. ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. मधुकर भावे यांचे मार्गदर्शन पत्रकारांना लाभणार आहे. 18 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात अधिवेशनाचे उद्घाटन होईल. तत्पूर्वी उदगीर शहरातून प्रभात फेरी काढली जाणार असून त्यामध्ये शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी होतील. दुपारच्या सत्रात उदगीरमधून बाहेर पडून पत्रकारितेच्या क्षेत्रात देदीप्यमान यश मिळविणाऱ्या पत्रकारांचा सत्कार आणि त्यांच्या मनोगताचा कार्यक्रम प्रा. जयदेव डोळे यांच्या अध्यक्षतेखाली होईल.. दुपारी 4 ते 5.30 या वेळेत "लोकप्रतिनिधींच्या माध्यमांकडून अपेक्षा" या विषयावर आमदार रोहीत पवार यांची मुलाखत घेतली जाणार आहे..रात्री 7 वाजता *लोककलेचा जागर*हा मनोरंजनाचा कार्यक्रम होईल.. 19 एप्रिल रोजी सकाळी 9.30 वाजता राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे याची मुलाखत होईल.. पुढारी न्यूज चे संपादक प्रसन्न जोशी ही मुलाखत घेतील.. सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत माध्यमं सत्ताधाऱ्यांना झुकतं माप देताहेत का? या विषयावरील परिसंवादात भाजप उपाध्यक्ष केशव उपाध्ये, काँग्रेसचे हनुमंत पवार, राष्ट्रवादीचे सुरज चव्हाण, शिवसेनेचे राहूल लोंढे, उबाठाचे जयेश वाणी हे विविध राजकीय पक्षांचे प्रवक्ते सहभागी होतील.. पत्रकारांची बाजू मांडतील ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई..दुपारी 1.30 ते 3 या वेळेत "टीव्हीच्या पडद्यावरची दुनिया" या विषयावरील चर्चेत प्रसन्न जोशी, विशाल परदेशी, प्रज्ञा पोवळे, श्वेता दांडेकर, सौरभ कोरटकर, विशाल पाटील सहभागी होत आपले अनुभव सांगतील. ..दुपारी 3 ते 5 या वेळात अधिवेशनाचा समारोप समारंभ होईल.. शिवसेना नेत्या सुषमा अंधारे, जय महाराष्ट्रचे संपादक प्रसाद काथे आणि मुक्तपीठचे संपादक तुळशीदास भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.. एस.एम.देशमुख कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील.. समारोप समारंभात लातूर जिल्ह्यातील काही मान्यवर पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे. अधिवेशनास राज्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचं आवाहन विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रमुख अनिल वाघमारे, विभागीय सचिव तसेच अधिवेशन मुख्य संयोजक सचिन शिवशेट्टे, रवी उबाळे, मराठवाड्याचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, उदगीर तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष युवराज धोतरे , लातूर जिल्हा डिजिटल मिडीयाचे अध्यक्ष बिभीषन मद्देवाड , पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक अर्जुन जाधव ,जिल्हा डिजिटल मिडीयाचे सचिव सिद्धार्थ सुर्यवंशी तसेच परिषदेचे सर्व उपाध्यक्ष, विभागीय सचिव आणि कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे..




# संविधानातील मूल्ये तळागाळापर्यंत रुजविणे हेच खरे बाबासाहेबांना अभिवादन

## मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचे प्रतिपादन

**■ नांदेड प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान तयार करून मानवतेचे मूलभूत अधिकार दिले. त्यांनी सामाजिक व आर्थिक समतेची मूल्ये रुजवली तसेच स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार प्रदान केला. संविधानातील या मूल्यांची प्रभावी अंमलबजावणी तळागाळापर्यंत करणे, हेच खरे बाबासाहेबांना अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, डी.बी. गिरी, अमित राठोड, मयूरकुमार आंदेलवाड, प्रशांत थोरात, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, नियोजन शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे, अवधूत गंजेवार, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, अशोक भोजराज, संजय शिंदे, कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, लेखाधिकारी निळकंठ पांचगे, विशाल हिवरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यातून संविधानातील न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांची जपणूक करावी. गावपातळीवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देत नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर राहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती केवळ एक दिवस साजरी करून न थांबता, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी दैनंदिन कामकाजातून व्हावी. तरुणांनी बाबासाहेबांना समजून घेण्यासाठी त्यांचे साहित्य वाचून चिंतन करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी लेखाधिकारी निळकंठ पांचगे यांनी आपले संविधान-आपला स्वाभिमान या विषयावर मार्गदर्शन करत संविधान निर्मितीचा प्रवास उलगडून सांगितला. प्रत्येक घरात संविधान असावे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मिलिंद व्यवहारे यांनी केले. या कार्यक्रमाला रंजीत गजभारे, राजेश जोंधळे, धनंजय गुम्मलवार, विजय वाघमारे, पवन तलवारे, राघवेंद्र मदनुरकर, बालाजी नागमवाड, अशोक मोकले, सचिन चौधरी, छाया कांबळे, नंदलाल लोकडे, प्रमोद गायकवाड, संजय वाठोरे, बालाजी टोके, उमाकांत हळे, सुनील वाघमारे, रामदास शेकापुरे, दिलीप महालिंगे, गणेश आंबेकर, उज्वला गजभारे, स्वाती जोंधळे, प्रेमला चौदंते, बालाजी आवर्दे, गजानन आगरमोरे यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान सकाळी जिल्हा परिषदेच्या परिसरातून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास भव्य पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेतर्फे अन्नदान व पाणी वाटप उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# दिडशे वर्षांची परंपरा असलेल्या श्री.पापदंडेश्वराचा पालखी सोहळा उत्साहात संपन्न





### तब्बल पंचवीस तास चालतो पालखी सोहळा

**गाढे पिंपळगाव येथील श्री.पापदंडेश्वर मंदिर हे १२ व्या शतकातील असून हेमाडपंती आहे. येथील पालखी सोहळा अति प्राचीन असून या मंदिराचे संवर्धन होणे आवश्यक आहे, तसेच या मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास योजनेत सहभागी करणे गरजेचे आहे. तरच या मंदिराचे संवर्धन होईल. हा पालखी सोहळा मध्यरात्री १२ वाजता निघतो, ग्रामप्रदक्षिणा होते. दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजता महाआरती होवून महाप्रसादाने सांगता होते. गावातील सर्व लग्न झालेल्या मुली, बाहेर गावी असलेले गावकरी नौकरदार, इतर कामांसाठी बाहेरगावी गेलेले या सोहळ्यासाठी गावात येत असतात.**

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री. पापदंडेश्वराचा पालखी सोहळा बुधवारी (ता.१५) पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या दिडशे वर्षाहून अधिक वर्षाची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री. पापदंडेश्वराच्या पालखी सोहळ्याचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते. गाढे पिंपळगाव येथे श्री.पापदंडेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन बुधवार (ता.०८) ते बुधवार (ता.१५) पर्यंत करण्यात आले होते. या कालावधीत तृप्ती पवार यांची शिव कथा दुपारी १ ते ५ दरम्यान आयोजन करण्यात आली होती. ज्ञानेश्वरी पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रम भजन,किर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाची सांगता वार्षिक पालखी सोहळ्याने करण्यात आली. मंगळवारी (ता.१४) रात्री बारा वाजता परंपरेने ढोल ताश्यांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीने या पालखी सोहळ्याची सुरुवात झाली. पापदंडेश्वर मंदिरातून श्री. पापदंडेश्वराची पालखी मंगळवारी रात्री १२ वाजता पापदंडेश्वर महाराज की जय, हर हर महादेव, गुरुराज माऊलीच्या जयघोषात प्रस्थान करण्यात आले. श्री.पापदंडेश्वर महाराज पालखीचे गावातील रस्त्यावर सडा, रांगोळी, दिवे लावून स्वागत करण्यात आले. भजनी मंडळीसाठी ठिकठिकाणी रात्री चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पालखीचा कराड गल्लीत (लादनी पुढे) विसावा घेण्यात आला. याठिकाणी रात्रभर मालेवाडी, सारडगाव, सबदाराबाद, बाभळगाव, परळी येथील भारुडकारांच्या भारुडांनी मोठी रंगत आणली, सकाळी पाच वाजेपर्यंत ही भारुडे चालली. बुधवारी सकाळी पालखी मुख्य चौकात (मोठ्या दुकानासमोर) आल्यानंतर गवळणी व सोंगाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात समाजप्रबोधन पर सोंगे सादर करण्यात आली. पालखी मार्गावर भजनी पावले, फुगडी उत्साहात खेळत होते, विशेष म्हणजे महिलाही यात सहभागी झाल्या होत्या. दुपारी दोनच्या सुमारास पापदंडेश्वराची महाआरती करण्यात आली. नंतर भक्तांसाठी थोंटे परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मोठा भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्त व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मनसेच्या दणक्यानंतर महावितरणला जाग!

### 'तक्रार निवारण मेळाव्याचे नाटक नको, थेट चौकशी करून गुन्हे दाखल करा'

**आष्टी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) प्रशासनाला धारेवर धरले होते. या दणक्यानंतर अखेर महावितरणला जाग आली असून, त्यांनी गुरुवारपासून (१६ एप्रिल) शेतकऱ्यांसाठी 'तक्रार निवारण मेळावे' आयोजित केले आहेत. मात्र, मनसेने या मेळाव्यांच्या हेतूवरच शंका उपस्थित केली असून, हे कॅम्प म्हणजे झालेले गैरप्रकार दडपण्याचा डाव तर नाही ना, असा सवाल मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी विचारला आहे.

कैलास दरेकर यांनी १ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सौर कृषी पंप योजनेतील भ्रष्टाचाराची पोलखोल केली होती. यात प्रामुख्याने ऑनलाईन सिस्टीममध्ये छेडछाड करून पात्र शेतकऱ्यांची नावे बेकायदेशीरपणे हटवणे, आर्थिक तडजोड करून बोगस आणि धनदांडग्या व्यक्तींना पंपांचे वाटप करणे, ७/१२ उताऱ्यात खाडाखोड करून नियमबाह्य पद्धतीने अधिक क्षमतेचे (७.५ एचपी) पंप लाटणे, अनुसूचित जाती (SC) प्रवर्गाच्या आरक्षणावर डल्ला मारणे असे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा मनसेने दिला होता. आता महावितरण या मेळाव्यांमधून शेतकऱ्यांना खरोखर न्याय देणार की मनसेने उपस्थित केलेल्या शंकेनुसार हे केवळ एक 'नाटक' ठरणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

■ महावितरणची सारवासारव: तक्रार निवारण मेळाव्यांचे आयोजन

मनसेच्या या आक्रमक भूमिकेनंतर आणि वाढत्या दबावानंतर, महावितरणने १६ ते २० एप्रिल दरम्यान बीड जिल्ह्यातील आष्टी, शिरूर कासार, पाटोदा, गेवराई, आंबेजोगाई, माजलगाव, परळी, आणि केज या उपविभागीय कार्यालयांमध्ये 'तक्रार निवारण मेळाव्यांचे' (कॅम्प) आयोजन केले आहे. या मेळाव्यांत महावितरणचे अधिकारी आणि एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहून जागेवरच तक्रारी सोडवतील, असा दावा प्रशासनाने केला आहे.

■ 'कॅम्पचे नाटक थांबवा, थेट गुन्हे दाखल करा'

■ महावितरणने जाहीर केलेल्या या मेळाव्यांवर कैलास दरेकर यांनी कडाडून टीका केली आहे. त्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले आहेत:

■ - मनसेने पुराव्यासह निवेदन दिल्यानंतरच महावितरणला अचानक जाग का आली?

■ - हे कॅम्प शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आहेत की अधिकाऱ्यांनी केलेले कोट्यवधींचे गैरप्रकार दडपून प्रकरण शांत करण्यासाठी आहेत?

■ - संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी कॅम्प घेण्याचे नाटक करू नये. त्याऐवजी, प्रशासनाने तातडीने एक स्वतंत्र 'चौकशी समिती' नियुक्त करावी. या समितीमार्फत सरसकट सर्व प्रकरणांची छाननी करून दोषी अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सीवर थेट फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत.

■ शेतकऱ्यांना आवाहन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीतून पळ काढणाऱ्या गुन्हेगाराला पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पकडले

### एका महिन्यापासून पोलिसांना गुंगारा देणारा अभिषेक डोंगरे अखेर जेरबंद; बीड पेठ पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**बीडः प्रतिनिधी**

खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात गेल्या एक महिन्यापासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला बीडच्या पेठ पोलिसांनी ३५ किलोमीटरपर्यंत फिल्मी स्टाईलने पाठलाग करून अत्यंत शिताफीने अटक केली आहे. अभिषेक विश्वास उर्फ पोपट डोंगरे (वय २५, रा. सोन्नाखोटा, ता. वडवणी) असे या अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



■ नेमकी घटना काय?

दिनांक ४ मार्च २०२६ रोजी फिर्यादी अमोल अशोकराव कांबळे यांच्या ट्रॅव्हल्सची स्टेपनी काढून घेत आरोपींनी १० हजार रुपयांची मागणी केली होती. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपी अभिषेक डोंगरे आणि त्याच्या साथीदारांनी फिर्यादीवर लोखंडी हत्याराने खुनी हल्ला केला होता. याप्रकरणी पेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.


■ तेव्हापासून आरोपी फरार होता.-

मिरवणुकीतून पलायन आणि पोलिसांचा पाठलाग दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आरोपी येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार डी.बी. पथकाने सापळा लावला असता, आरोपीने गर्दी आणि अंधाराचा फायदा घेत भिंतीवरून उडी मारून पळ काढला. मात्र, पोलिसांनी हार न मानता त्याचा पाठलाग सुरू ठेवला. आरोपी आपल्या मूळ गावी सोन्नाखोटा (ता. वडवणी) येथे जात असल्याचे समजताच पोलिसांनी तब्बल ३५ किमी पाठलाग केला. अखेर 'तरे' गावातील आपल्या नातेवाईकाच्या घराच्या गच्चीवर दबा धरून बसलेल्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने पकडले.

आरोपी अभिषेक डोंगरे याच्यावर यापूर्वीही खुनाचा प्रयत्न, अवैध शस्त्र बाळगणे, मारहाण आणि अवैध दारू विक्री असे एकूण ५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने आरोपीला २० एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहायक पोलीस निरीक्षक प्रितमकुमार पुजारी, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा व त्यांच्या पथकाने यशस्वी केली आहे.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत घवघवीत यश




**परळी (प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करून १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रुवारी- मार्चमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत दहावीतील ८५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. परळी तालुक्यातून सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत यशराज बेंबलगे(९८%) या विद्यार्थ्याने प्रथम येऊन शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

सदरील परीक्षेत शाळेतील १५ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त मार्क्स मिळविले आहेत. यामध्ये यशराज बेंबलगे(९८%), रुद्राक्ष गुट्टे(९६%), वैष्णवी जाधव(९६%), तेजस्विनी गुट्टे(९५.६०%), श्रेयश बळवंत(९५.२०%),तन्मय बेंबलगे(९३.८०%), अमरनाथ कराड(९३.६०%), प्रथमेश लहाने(९२.८०%), अनुष्का नागरगोजे(९२.४०%), कपिल सावंत (९२.२०%), सार्थक केंद्रे (९१.८०%), वैष्णवी मुंडे(९१.४०%), अभिलाषा दहिवाळ (९१.२०%), नंदिनी चाटे (९०.६०%), आकांक्षा गुट्टे (९०.२०%)यांचा समावेश आहे. तसेच ८०% ते ९०% यादरम्यान२७ व ७०% ते ८०% यादरम्यान २५ विद्यार्थी आहेत.

शाळेतील काही विद्यार्थ्यांनी विविध विषयामध्ये 100 पैकी 100 गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळविले आहे. यामध्ये संस्कृत विषयांमध्ये यशराज बेंबलगे, प्रथमेश लहाने, श्रेयश बळवंत व मराठी आणि सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये वैष्णवी जाधव यांचा समावेश आहे. तसेच गणित या विषयांमध्ये यशराज बेंबलगे(९५),प्रथमेश लहाने(९०), श्रेयश बळवंत(८९), इंग्रजीमध्ये यशराज बेंबलगे(९८),आकांक्षा गुट्टे (९८), वैष्णवी जाधव (९८), विज्ञानमध्ये यशराज बेंबलगे(९५), तेजस्विनी गुट्टे (९२), रुद्राक्ष गुट्टे(९२), मराठीमध्ये वैष्णवी जाधव (१००),अन्वी मुंडे (९९),रुद्राक्ष गुट्टे(९८), संस्कृतमध्ये यशराज बेंबलगे(१००), प्रथमेश लहाने(१००), श्रेयश बळवंत(१००), हिंदीमध्ये प्रणव मोडीवाले(९२), पार्थ बडे(९१), राधिका मुरकुटे(९१), प्रथमेश काळे(९१), सामाजिक शास्त्रामध्ये वैष्णवी जाधव(१००), यशराज बेंबलगे(९९), राधिका मुरकुटे(९७) तर आय.टी.मध्ये यशराज बेंबलगे(९८), रुद्राक्ष गुट्टे (९८), श्रेयस बळवंत(९८), वैष्णवी मुंडे(९८), नंदिनी चाटे(९८), श्रेयश मुंडे(९८) गुण मिळविले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत सर्वच विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केल्यामुळे विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब IAS (सचिव,त्रिपुरा सरकार) व शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांनी सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदनही केले. तसेच इयत्ता दहावीतील सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छाही दिल्या.

## पाडळीच्या अश्विनी पाटील यांनी मिळवले प्रज्ञायोगामध्ये प्राविण्य

**शिराळा / प्रतिनिधी**

शिराळा तालुक्यातील पाडळी गावच्या योगा टीचर सौ.अश्विनी भगवान पाटील यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून प्रज्ञायोगामध्ये कौशल्य संपादन केले असून त्या प्रज्ञायोगाच्या टीचर म्हणून सक्रिय झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या अंतर्ज्ञान विकसनाला गती मिळणार आहे. त्याबद्दल शिराळा तालुका आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या योगा प्रशिक्षिका म्हणून त्या अनेक वर्षापासून कार्यरत आहेत. ५ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्यासाठी हे प्रशिक्षण खूप महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी, संस्कारासाठी आणि त्यांच्या करियरसाठी हा कोर्स अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगमधील अनेक प्रशिक्षणे त्यांनी यापूर्वी यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. अनेक निवासी योगावर्ग त्या सातत्याने विविध ठिकाणी घेत असतात. हे प्रशिक्षण त्यांनी बंगलोर येथे पूर्ण केले आहे. अशा प्रकारचे योगा प्रशिक्षण यावर्षी पूर्ण करणाऱ्या त्या सांगली जिल्ह्यातील एकमेव योगा टीचर आहेत.




या गटातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण खूपच आश्चर्यकारी आणि जलद रिझल्ट देणारे आहे. या योगा कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ध्यान करायला शिकवले जाते. मन शांत कसे ठेवावे हे शिकवले जाते. मेंदूचा उजवा भाग सक्रिय करण्याचे व्यायाम शिकवले जातात. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी हे योगा प्रशिक्षण सुरू केले आहे. त्याबद्दल शिराळा तालुका आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या शिबीरात ५ ते १८ वर्षे वयोगटात बालकांना योगा प्राणायाम, ध्यान, अँडव्हान्स साधना ॲक्टिव्हिटी घेतल्या जातात.

स्वागत भगवान पाटील यांनी केले. आभार स्वप्निल काटवटे यांनी मानले.

यावेळी प्राचार्य सुनील जोशी, उद्योजक सचिन शेटे, पाडळी सोसायटीचे माजी अध्यक्ष अमृत पाटील, संचालक आनंदा पाटील, योगा टीचर निखिल साळुंखे, श्रीरंग गायकवाड, जयश्री पाटील, डॉ.मिथुन पाटील, मधुकर पाटील, तानाजी माने, भीमराव पाटील, माधवराव पाटील, अंजली पाटील, सुप्रिया नलवडे, प्राची पाटील, जयश्री पाटील उपस्थित होते.

फोटोओळी : पाडळी येथे अश्विनी पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य सुनील जोशी, निखिल साळुंखे, सचिन शेटे, श्रीरंग गायकवाड, भगवान पाटील.

# दिव्यांगांच्या आयुष्याला मिळणार भक्कम आधार; डॉ. संतोष मुंडे यांच्या पुढाकाराने 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' नोंदणी शिबिराचा शुभारंभ

## परळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दिव्यांगांसाठी अनोखी भेट; मोफत नोंदणी शिबिरास मोठा प्रतिसाद

परळी (प्रतिनिधी):

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून मौजे रामेवाडी येथे 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' मोफत नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक बाबासाहेब उत्तमराव पौळ यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. माजी कृषिमंत्री आ. धनंजय मुंडे, मा.ना. पंकजाताई मुंडे आणि दिव्यांग कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांच्या प्रेरणेने राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमातून दिव्यांगांना भविष्यात मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

■ २१ एप्रिलपर्यंत नोंदणीची संधी -

शिबिराच्या पहिल्याच दिवशी दिव्यांग बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली नोंदणी केली. यावेळी बोलताना डॉ. संतोष मुंडे म्हणाले की, "हे पोर्टल दिव्यांगांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. २१ एप्रिलपर्यंत ही नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार असून, तालुक्यातील एकही दिव्यांग नागरिक यापासून वंचित राहू नये, हाच आमचा मुख्य उद्देश आहे."

ज्या नागरिकांची या पोर्टलवर नोंदणी पूर्ण होईल, त्यांनाच भविष्यात मिळणाऱ्या शासकीय साहित्याचा आणि आर्थिक लाभाचा लाभ घेता येईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या प्रसंगी विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा या देखाव्याने भैमसैनिकाचे लक्ष वेधले

## नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारीसह विविध मान्यवरांच्या हस्ते अनावरण



परळी | प्रतिनिधी

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135व्या जयंती निमित्ताने रोडे चौक येथे शिका संघटित व्हा व संघर्ष करा विद्यार्थ्यांसाठी मुल मंत्र देणाऱ्या देखाव्याचे परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते अनावरण जयंतीच्या पुर्वसंधेला करण्यात आले.

युवानेते महेंद्र रोडे यांच्या संकल्पनेतुन तर नगरसेविका अर्चनताई महेंद्र रोडे त्यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा मुलमंत्र देणारा देखावा सादर केला.यावेळी बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे सर, पाणीपुरवठा सभापती रवींद्र पापा गीते, दीपक तांदळे, वैजनाथराव सोळंके नगरसेवक प्रितेश तोतला, नगरसेवक इस्माईल पटेल ,रवींद्र भैया परदेशी, भगवान साकसमुद्रे जालिंदर नाईकवाडे, सुरेश रोडे, रवी मुळे,राम व्हावळे,विश्वनाथ गायकवाड ,यशपाल मुंडे, सुनील कांबळे, सुभाष वाघमारे, बालाजी घोबाळे, जितेंद्र मस्के आदी शेकडो भीमसैनिकांच्या उपस्थितीत अनावरण करण्यात आले.

या देखाव्याचे आयोजक नगरसेविका सौ.अर्चना महेंद्र रोडे यांनी परिश्रम घेतले श्रीपाल रोडे, विकास जाधव,श्रीकांत रोडे, गौतम रोडे,प्रशांत रोडे, सुकराम रोडे, किशन जोगदंड ,सिद्धार्थ मस्के,बाळू हजारे, मिलिंद व्हावळे, सौ.सुषमा गरुड, सौ.पुनम कांबळे, सौ.प्रज्ञा जाधव यांच्या वतीने करण्यात आले ,तर या देखाव्याला माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा.डॉ.विनोद जगतकर यासह अनेकांनी भेट दिली.

# जिथे देवाची भूमी, तिथे सुविधा पुरवा; राजकीय नेतृत्वाला कोणताही धोका नाही :ह.भ.प.लक्ष्मण महाराज पाटील

## अशा भोंदू खरात बाबाला भर चौकात उभे करून गोळ्या घालून ठार मारले पाहिजे

## कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता

आष्टी (प्रतिनिधी)

वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनाला मौलिक तत्त्वे आणि चांगुलपणाची दिशा देणारा अलौकिक विचार आहे.जिथे जिथे देवाची अर्थात संतांची भूमी आहे, तिथे राजकीय नेतृत्वाने सोयीसुविधा पुरवाव्यात असे केल्यास तुम्हाला कधीही धोका निर्माण होणार नाही असे परखड आणि मार्गदर्शक विचार आळंदी येथील प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प.लक्ष्मण महाराज पाटील यांनी व्यक्त केले.

आष्टी तालुक्यातील कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवमहापुराण कथेची बुधवारी दि. १५ एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी अण्णासाहेब चौधरी,सतीशआबा शिंदे,सरपंच श्याम धस,अमोलराजे तरटे,चेअरमन शांतीलाल भोसले, अशोक पोकळे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच शालन अशोक मुळे, माजी सरपंच अदिकाताई लोखंडे, मोहन घुले, दत्ताभाऊ सायकड, मनोज धनवडे, सचिन वारंगुळे, कपिल अग्रवाल, शरद रेडेकर,शरद गर्जे,ह.भ.प.संतोष महाराज मोरे,ह.भ. प.श्रीहरी पुरी महाराज,ह.भ.प. ब्रह्मचैतन्य तावरे महाराज,ज्ञानदेव जगताप महाराज,ह. भ.प.उत्तम पोकळे, तुकाराम भोसले, अशोक काकडे, अशोक काकडे, बाळकृष्ण राऊत, मच्छिंद्र गाडे, भाऊसाहेब जाधव, मुरलीधर सुळे, दत्तात्रय खाडे, किशोर बोराडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित हजारो भाविकांना मार्गदर्शन करताना ह.भ.प.पाटील महाराज यांनी अनेक संत महात्म्यांचे दृष्टांत देत उपस्थितांना प्रबोधन केले. संतांचे विचार मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त



असल्याचे सांगून ते म्हणाले की, "इस्कॉनसारख्या शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या संप्रदायाने अल्पावधीत जागतिक स्तरावर प्रचंड प्रगती केली आहे. त्याच धर्तीवर हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा असलेल्या आपल्या वारकरी संप्रदायानेही आता कात टाकून उच्च स्तरावर अधिक व्यापक प्रगती साधण्याची गरज आहे. या अनुषंगाने त्यांनी विविध धार्मिक ग्रंथांतील दाखले देत संतभूमीचे महत्त्व अधोरेखित केले. ह.भ.प.पाटील महाराज पुढे म्हणाले की, "त्या" भोंदू बाबाला भर चौकात गोळ्या घालून ठार मारले पाहिजे असे

ह.भ.प.पाटील महाराज यांनी खळबळजनक आणि आक्रमक विधान केले आहे.

सध्या सर्वत्र चर्चेचा आणि संतापाचा विषय ठरलेल्या 'भोंदू खरात महाराज' प्रकरणावर आता प्रबोधनकार आणि कीर्तनकारांमधूनही अत्यंत संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. समाजातील अज्ञानाचा आणि श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या या भोंदू बाबाच्या कृत्यांवर कडाडून टीका करताना ह.भ.प. पाटील महाराज यांनी अत्यंत परखड शब्दांत आपले मत व्यक्त केले आहे. "भोंदू खरात महाराज याच्यापेक्षा त्याच्या नादी लागून तिथे जाणारे लोकच महामूर्ख आहेत," अशा शब्दांत त्यांनी अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या लोकांचे वाभाडे काढले. सध्या सुरू असलेल्या या ज्वलंत विषयावर बोलताना पाटील महाराज यांचा संताप अनावर झाला होता.भोंदू बाबांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्याला बळी पडणाऱ्या समाजावर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.समाजातील अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कायद्याचा धाक असणे आवश्यक आहेच,परंतु अशा गुन्हेगारांना मिळणारी शिक्षा समाजासाठी एक धडा असली पाहिजेअशी भावना त्यांनी बोलून दाखवली.

या भोंदू बाबाच्या कृत्यांचा समाचार घेताना पाटील महाराजांनी एक अत्यंत आक्रमक आणि खळबळजनक भूमिका मांडली. ते म्हणाले की,

अशा भोंदू आणि खरात बाबाला भर चौकात उभे करून गोळ्या घालून ठार मारले पाहिजे. हीच त्याच्या या नीच कृत्यांची खऱ्या अर्थाने योग्य शिक्षा ठरेल.ह.भ.प. पाटील महाराजांच्या या आक्रमक विधानामुळे सध्या मोठी चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे समाजातील काही लोक अशा भोंदूगिरीला बळी पडत असताना, प्रबोधन करणाऱ्या महाराजांकडून अशा कडक शब्दांत संताप व्यक्त होणे, हे सामान्य जनतेच्या मनातील खदखद दर्शवणारे आहे. पाटील महाराजांच्या या स्पष्ट आणि रोखठोक भूमिकेमुळे अंधश्रद्धा आणि अशा भोंदू बाबांचे स्तोम हा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून,आता या प्रकरणात प्रशासन काय कठोर पावले उचलते,याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# महापुरुषांच्या विचारांचे प्रचारक निर्माण व्हावेत - नितीन सावंत

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणावेत - मुख्य अभियंता सुनील इंगळे

परळी / प्रतिनिधी:

परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव समारोपाचा कार्यक्रम दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून नितीन सावंत उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे हे होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना व्याख्याते नितीन सावंत म्हणाले की, "आज प्रतिगामी शक्ती देशांतर्गत डोके वर काढत असताना, समतेचे पुरस्कार करणाऱ्या महामानवांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रचारक निर्माण होण्याची गरज आहे."

तसेच, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ



वाचण्यापुरते मर्यादित न ठेवता ते दैनंदिन जीवनात आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

या कार्यक्रमास उपमुख्य अभियंता हिम्मत अवचार, अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, धनंजय कोकाटे, प्रसन्नकुमार गरुड, सहायक कल्याण



अधिकारी शरद राठोड, सौ. अनिता सुनील इंगळे, शितल मगरे मॅडम, वरिष्ठ सुरक्षा अधिकारी बी. आर. अंबड, संजय उदार, निखिल मेश्राम, कार्यकारी अभियंता सुमित गायकवाड, कार्यकारी अभियंता पंकज दगडे, उपकार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे, डी. एस. डोंगरे, कामगार नेते



संदीप पाटील, हरिराम गित्ते, लक्ष्मण शिंदे, वैजनाथ चाटे, भगवान साकसमुद्रे,अरुण गीते, राजू गजले आणि संघरक्षित मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

जयंतीनिमित्त सकाळी प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर माजी सैनिक मेस्को च्या वतीनेही अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रेरणा सार्वजनिक वाचनालयाच्या समोर प्रबोधन कार्यक्रम आणि विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरणाचा मुख्य सोहळा पार पडला. जयंती उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभियंता एस. एल. होटकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रदीप चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार बप्पा वडमारे यांनी मानले.